N.C.R.B (एन.सी.आर.बी)

I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

# FIRST INFORMATION REPORT

(Under Section 173 B.N.S.S)

प्रथम खबर अहवाल

(कलम बी एन एस एस १७३ च्या अंतर्गत)

1. **District (जिल्हा):** छत्रपती संभाजीनगर शहर **P.S.(ठाणे):** कँटोनमेंट (छावणी ) **Year (वर्ष):** 2024

**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0603

**Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):** 10/12/2024 23:50

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**

1. **Day(दिवस):** मंगलवार
   **Date From (दिनांक पासून):** 10/12/2024
   **Date To ( दिनांक पर्यंत):** 10/12/2024
   **Time Period (कालावधी):** पहर 6
   **Time From (वेळेपासून):** 18:04 बजे
   **Time To (वेळेपर्यंत):** 18:15 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**

**Date (दिनांक ):** 10/12/2024 **Time (वेळ):** 23:40 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**

**Entry No. (नोंद क्र.):** 024

**Date & Time (दिनांक आणि वेळ):** 10/12/2024 23:40 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी

5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**

1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):** **Beat No. (बिट क्र.):**

पश्चिम, 2 किमी

(b) **Address (पत्ता):** छत्रपती संभाजीनगर

(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**

**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**

**District(State) (जिल्हा(राज्य)):**

Scanned with OKEN Scanner

6. **Complainant / Informant** (तक्रारदार/माहिती देणारा):

(a) **Name** (नाव): वैभव नामदेव घोळवे

(b) **Father's/Husband's Name**(वडील / पती चे नाव) :

(c) **Date/Year of Birth** (जन्म तारीख/वर्ष): 1990

(d) **Nationality** (राष्ट्रीयत्व): भारत

(e) **UID No.** (यु.आय.डी. क्र.):

(f) **Passport No.**(पारपत्र क्र.):

**Date of Issue** (दिल्याची तारीख):

**Place of Issue** (दिल्याचे ठिकाण):

(g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN)** ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )

| S.No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address** (पत्ता):

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | एन-9, शिवनेरी कलनी, सिडको,छत्रपती संभाजीनगर ,कँटोनमेंट (छावणी ), छत्रपती संभाजीनगर शहर,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | एन-9, शिवनेरी कलनी, सिडको,छत्रपती संभाजीनगर ,कँटोनमेंट (छावणी ), छत्रपती संभाजीनगर शहर,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation** (व्यवसाय):

(j) **Phone number** (फोन नं.):

**Mobile** (मोबाइल नं.): 91-9764608853

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars** (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | प्रदिप रामराव चव्हाण | | | 1. एन-10, पोलीस कलनी , बिल्डींग नं 02 हडको,छत्रपती संभाजीनगर ,कँटोनमेंट (छावणी ),छत्रपती संभाजीनगर शहर, महाराष्ट्र,भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant** (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):

9. **Particulars of properties of interest** (संबंधीत मालमत्तेचा तपशील):



Scanned with OKEN Scanner

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs ) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|

10 **Total value of property (In Rs/-)**
(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):

11. **Inquest Report / U.D. case No., if any**
(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

12. **First Information contents** (प्रथम खबर हकीकत ):

फिर्याद

दिनांक 10/12/2024

मी वैभव नामदेव घोळवे, वय 34 वर्षे, व्यवसाय-नौकरी, लिपीक समाजकल्याण विभाग, छत्रपती संभाजीनगर, रा. एन-9, शिवनेरी कॉलनी, सिडको, छत्रपती संभाजीनगर ता.जि. छत्रपती संभाजीनगर मो.क्र. 9764608853. समक्ष हजर येवुन फिर्याद देतो की, मी दिनांक 10/12/2024 रोजी पोलीस निरीक्षक श्री.शांतीलाल चव्हाण, ला.प्र. वि.छत्रपती संभाजीनगर यांचे समक्ष ला.प्र.वि.छत्रपती संभाजीनगर कार्यालयात दोन पंचा समक्ष लेखी तक्रार दिली होती ती पुढील प्रमाणे...

आज दि.10/12/2024 रोजी समक्ष लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, छत्रपती संभाजीनगर येथे हजर येवुन दोन शासकीय पंचासमक्ष स्व-हस्ताक्षरात तक्रार लिहुन देत आहे. दिनांक 09/12/2024 रोजी मी जिल्हा व सत्र न्यायालय, छत्रपती संभाजीनगर येथे माझ्या मित्रास भेटण्यासाठी गेलो. त्यावेळी मी माझी ईलेक्ट्रीक स्कुटर क्रमांक MH-20-GF-5702 टिव्हीएस आयक्युब कोर्ट कॅम्पाउण्ड समोर फुटपाथ जवळ लावली होती. थोडया वेळाने मी मित्रास भेटुन स्कुटर लावल्या ठिकाणी आलो असता माझी स्कुटर वाहतुक पोलीसांनी उचलुन नेली असुन ती छावणी पोलीस स्टेशन जवळील शहर वाहतुक शाखेचे वाहनतळ येथे नेली असल्याचे समजले. त्यामुळे मी लगेचच सदर ठिकाणी गेलो त्या ठिकाणी माझी ईलेक्ट्रीक स्कुटर मला दिसल्याने मी तेथे असलेले पोलीस श्री.चव्हाण साहेब यांना माझी ईलेक्ट्रीक स्कुटर क्रमांक MH-20-GF-5702 टिव्हीएस आयक्युब सोडण्याची विनंती केली. त्यावेळी श्री. चव्हाण साहेब यांनी मला मी तुझी स्कुटर सोडतो तुला 1500/- रुपये भरावे लागतील परंतु माझ्या सांगण्यानुसार एैकले तर तुझी स्कुटर विना पावती पाच-सातशे रुपये घेवुन सोडून देतो. असे बोलुन माझ्याकडे लाचेची मागणी केली आहे. मी त्यांना माझ्याकडे आज पैसे नसल्याचे सांगितल्याने त्यांनी मला उदया ये असे सांगितले आहे. मला त्यांना लाच देण्याची ईच्छा नसल्याने मी त्यांना नाईलाजाने हो म्हणुन तेथुन निघुन आलो आहे. माझे पोलीस श्री.चव्हाण साहेब यांचेशी कोणत्याही प्रकारे वैर अगर दुश्मणी नसून माझा व त्यांचा उसनवारीचा किंवा पैसे देण्या-घेण्याचा व्यवहार नाही.

तरी दिनांक 10/12/2024 रोजी सांयकाळी मी माझी ईलेक्ट्रीक स्कुटर आणण्यासाठी पोलीस स्टेशन छावणी जवळील शहर वाहतुक शाखेचे वाहनतळ येथे जाणार आहे त्यावेळी पोलीस श्री.चव्हाण साहेब हे माझी स्कुटर सोडण्यासाठी माझ्याकडे लाचेची मागणी करुन लाच रक्कम स्विकारल्यास त्यांचेवर कायदेशीर कारवाई होणेस विनंती आहे.

मी दिलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने पोलीस निरीक्षक श्री.शांतीलाल चव्हाण यांनी बोलविलेले शासकिय पंच क्र. 1 श्री. रविंद्र नाथा चव्हाण, वय 31 वर्षे, व्यवसाय-नोकरी, पद- कनिष्ठ लिपीक, वार्ड नं. 9 महानगर पालीका छत्रपती संभाजीनगर व पंच क्र. 2. श्री.विनोंद भानुदास साळवे, वय 49 वर्षे, व्यवसाय-नोकरी, पद- शिपाई, वार्ड नं. 9 महानगर पालीका छत्रपती संभाजीनगर असा आमचा ओळख परिचय करुन दिला. त्यानंतर मी थोडक्यात तोंडी तक्रार पंच व पो.नि.श्री. शांतीलाल चव्हाण यांना सांगुन माझी लेखी तक्रार दिली त्यावर मी दोन्ही पंचानी व पो.नि. श्री. शांतीलाल चव्हाण साहेब यांनी स्वाक्षरी केल्या आहेत.

माझ्या तक्रारीचे अनुषंगाने पो.नि.श्री. शांतीलाल चव्हाण व शासकिय पंच असे सर्वानुमते पोलीस श्री.चव्हाण यांची दिनांक 10/12/2024 रोजी छावणी पोलीस स्टेशन जवळील शहर वाहतुक शाखेचे वाहनतळ येथे जावुन लाच मागणीची पडताळणी करण्याचा निर्णय घेण्यात आला.



Scanned with OKEN Scanner

त्यानंतर पो.नि.श्री.शांतीलाल चव्हाण, सापळा पथक व शासकिय पंच असे सापळा कारवाईकामी लागणारे साहित्यासह खाजगी वाहनाने ला.प्र.वि. कार्यालय छत्रपती संभाजीनगर येथुन 16.30 वा.रवाना होवुन शहर वाहतुक शाखा वाहनतळाचे अलीकडे सुरक्षीत ठिकाणी थांबलो. तेथे पो.नि.श्री.शांतीलाल चव्हाण यांनी मला व पंचाना लाचमागणी पडताळणी मध्ये सोनी कंपनीची डीजीटल व्हाईस रेकॉर्डर वापरण्यात येणार असल्याचे सांगुन डिजीटल व्हाईस रेकॉर्डर बाबत माहिती दिली तसेच त्यामध्ये नविन मेमरी कार्ड टाकण्यात येणार असल्याचे सांगितले. त्यानंतर पंचासमक्ष डीजीटल व्हाईस.रेकॉर्डर मध्ये नविन मेमरी कार्ड टाकुन त्यामध्ये यापुर्वीचे काही संभाषण रेकॉर्ड नसल्याचे दाखवुन दिले. त्यानंतर माझ्याकडे व्हॉईस रेकॉर्डर चालु करुन देवुन पंच क्र. 1 श्री. रविंद्र नाथा चव्हाण यांचेसह त्यांचे मो.सा.वर पोलीस श्री.चव्हाण यांना भेटण्यासाठी 16.50 वा. रवाना केले. आम्ही पोलीस स्टेशन छावणी जवळील शहर वाहतुक शाखेच्या वाहनतळ येथे गेल्यानंतर मी पोलीस श्री.चव्हाण यांना भेटलो त्यांना माझी ईलेक्ट्रीक स्कुटर सोडण्याबाबत विनंती केली त्यावेळी पोलीस श्री.चव्हाण मला म्हणाले की, काल तुमच्यासाठी आम्ही थांबलो होतो बराच वेळ, तुम्ही आले नाही. त्यावर मी त्यांना म्हणालो की, काल उशीर झाला होता पैश्यांचा प्रॉब्लेम होता. त्यावर पोलीस श्री.चव्हाण म्हणाले 700/- रुपये भरा चला, त्यावर मी त्यांना म्हणालो की, फोन पे करु का तर श्री.चव्हाण म्हणाले की, फोन पे नाही कॅश दया, त्यावर मी त्यांना म्हणालो की, पावती होईल का त्यावर पोलीस श्री.चव्हाण म्हणाले की, आजची तुम्हाला पावती नाही. असे बोलणे झाल्यानंतर मी पंचासह सुरक्षीत ठिकाणी परत आलो व सापळा अधिकारी पो.नि.श्री. शांतीलाल चव्हाण यांना पंच क्र.1 यांनी व मी सर्व हकिगत सांगितली तसेच डीजीटल व्हाईस रेकॉर्डर मध्ये रेकॉर्ड झालेले संभाषण ऐकले त्यावरुन पोलीस श्री.चव्हाण यांनी लाचेची मागणी केली असल्याचे निष्पन्न झाल्याने पो.नि.शांतीलाल चव्हाण, पंच सर्वानुमते लगेचच दिनांक 10/12/2024 रोजी छावणी पोलीस स्टेशन जवळील शहर वाहतुक शाखेचे वाहनतळ येथे लाचेचा सापळा आयोजीत करण्यात आला.

सापळा कारवाईच्या वेळी पोलीस श्री.चव्हाण यांना लाच म्हणुन देण्याकरिता मी हजर केलेली 700/- रुपये रक्कम ज्यात 500/- रुपये दराची 1 नोट व 200/- रुपये दराची एक नोट त्यांना ॲन्थ्रोसिन पावडर लावुन माझ्या शर्टच्या समोरील डाव्या बाजूच्या खिश्यात ठेवण्यात आल्या. माझ्याकडे व्हॉईस रेकॉर्डरमध्ये नविन मेमरी कार्ड टाकुन व्हाईस रेकॉर्डर चालु करुन देवुन मला व पंच क्रमांक क्र.1 श्री. रविंद्र नाथा चव्हाण असे आम्हाला सुरक्षीत ठिकाणावरुन 17.55 वा. रवाना केले. त्यानंतर मी पंच क्र.1 श्री.रविंद्र नाथा चव्हाण असे त्यांचे मो.सा.वर आम्हाला छावणी पोलीस स्टेशन जवळील शहर वाहतुक शाखेचे वाहनतळ येथे गेलो तेथे श्री.चव्हाण यांना भेटलो व त्यांना म्हणालो की, हे 700/- रुपये म्हणुन माझ्या शर्टच्या समोरील डाव्या बाजूच्या खिश्यातुन लाचेची रक्कम उजव्या हाताने काढून श्री.चव्हाण यांचे समोर धरली असता त्यांनी पंच क्र. 1 यांचे समक्ष सदरची लाचेची रक्कम त्यांच्या उजव्या हाताने स्वत: स्विकारुन त्यांचे कमरेस लावण्यात आलेल्या लेदर पाऊच मध्ये ठेवली. त्यानंतर श्री. चव्हाण यांनी माझे नाव व स्कुटरचा क्रमांक विचारुन मला 200/-रुपयाची पावती दिली. त्यावर मी श्री.चव्हाण पोलीस यांना म्हणालो की, पावती दोनशेची आहे साहेब मी तर 700/- रुपये दिले त्यावर श्री.चव्हाण पोलीस म्हणाले की, लिफ्टींगचे चे 200/-रुपये आहे. पाचशे रुपये नो-पार्किंगचे त्यावर मी त्यांना म्हणालो की, मग त्याची पावती त्यावर लोकसेवक श्री.चव्हाण म्हणाले की, पावती नाही पडणार त्याच्यावर त्यावर मी त्यांना परत म्हणालो की, म्हंजे पाचशे तुमच्या लेवलवर आहे समजा त्यावर पोलीस श्री.चव्हाण म्हणाले-- हा...त्यानंतर 18.04 वाजेच्या सुमारास मला सांगितले प्रमाणे पैसे दिल्यानंतर माझी गाडी त्यांचे ताब्यातुन वाहनतळ येथुन बाहेर घेतल्यानंतर मी सापळा पथकास दिसेल अश्या रितीने पुर्वनियोजीत ईशारा केला असता सापळा पथकातील अधिकारी, कर्मचारी व पंच असे घटनास्थळी हजर आले व पोलीस निरीक्षक श्री.शांतीलाल चव्हाण यांनी लोकसेवक पोलीस श्री.चव्हाण यांना लाचेच्या रक्कमेसह ताब्यात घेतले. त्यांना आपला व सापळा पथकाचा परिचय देवुन त्यांना त्यांचे नाव विचारले असता त्यांनी त्यांचे नाव प्रदिप रामराव चव्हाण, वय 51 वर्षे, व्यवसाय-नोकरी, पद-सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक, नेमणुक-शहर वाहतुक शाखा, छत्रपती संभाजीनगर शहर, रा. एन-10, पोलीस कॉलनी बिल्डींग नं. 02 हडको, ता. जि.छत्रपती संभाजीनगर असे सांगितले. त्यानंतर पो.नि.श्री.शांतीलाल चव्हाण, दोन्ही पंच, सापळा पथक व पोलीस श्री.प्रदिप चव्हाण असे तेथुन लाचलुचपत प्रतिबंधक विभाग कार्यालय छत्रपती संभाजीनगर येथे आलो. सदर घटनेबाबत सविस्तर प्रचनामा करण्यात आला आहे.

तरी दिनांक 10/12/2024 रोजी लोकसेवक प्रदिप रामराव चव्हाण, वय 51 वर्षे, व्यवसाय-नोकरी, पद-सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक, नेमणुक-शहर वाहतुक शाखा, छत्रपती संभाजीनगर शहर यांनी जिल्हा न्यायालय छत्रपती संभाजीनगर येथुन उचलुन आणलेली माझी ईलेक्ट्रीक स्कुटर क्रमांक. MH-20-GF-5702 टिव्हीएस आयक्युब सोडण्यासाठी म्हणुन माझ्याकडे पंच साक्षीदारा समक्ष 700/- रुपये लाचेची मागणी करुन सदरील लाच रक्कम 700/-रुपये पैकी 200 रुपये कारवाईची पावती देवुन 500/- रुपये लाच रक्कम दिनांक 10/12/2024



Scanned with OKEN Scanner

रोजी 18.04 वाजेच्या सुमारास छावणी पोलीस स्टेशन जवळील शहर वाहतुक शाखेचे वाहनतळ छत्रपती संभाजीनगर येथे माझ्याकडून पोलीस श्री.प्रदिप रामराव चव्हाण, सपोउपनि यांनी पंचसाक्षीदारा समक्ष स्विकारली आहे. करिता लोकसेवक प्रदिप रामराव चव्हाण, वय 51 वर्षे, व्यवसाय-नोकरी, पद-सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक, नेमणुक-शहर वाहतुक शाखा, छत्रपती संभाजीनगर शहर यांचेवर योग्य ती कायदेशीर कारवाई होणेस विनंती आहे. माझी वरिल फिर्याद माझे सांगणे प्रमाणे माझे समक्ष मराठीत संगणकावर टंकलिखीत करण्यात आली असुन ती मी वाचुन पाहिली ती माझ्या सांगण्याप्रमाणे बरोबर व खरी आहे.

समक्ष हि फिर्याद दिली सही

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2. (केलेली कारवाई: बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)**

(1) **Registered the case and took up the investigation: (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):**

Dilip Shravan Thakur(I (Inspector)) / **or (किंवा)**

(2) **Directed (Name of I.O.) (तपास अधिका-याचे नाव):**

**Rank (पद):** **No.(क्र.):**

**to take up the Investigation (ला तपास करण्याचे अधिकार दिले) or (किंवा)**

(3) **Refused investigation due to (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):**

**or (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)**

(4) **Transferred to P.S. (गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):**

**District (जिल्हा):**

**on point of jurisdiction (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .**

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost. (प्र खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)**

**R.O.A.C.(आर. ओ .ए .सी.)**

Scanned with OKEN Scanner

14 **Signature/Thumb impression of the complainant / informant.**
(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

15. **Date and time of dispatch to the court**
(न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

D.O.अधिकारी
पोलीस ठाणे छावणी
छत्रपती संभाजीनगर (शहर)

**Signature of Officer in charge, Police Station**
(ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)

**Name (नाव):** Dilip Shravan Thak

**Rank(पद):** I (Inspector)

**No.(सं.):**

Scanned with OKEN Scanner